महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.५/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ५५२ दिनांक १३ / ०१ / २०१७

विषय: महावितरण कंपनीतील मुकबधीर अधिकारी/कर्मचारी यांना वाहतूक भत्ता मंजूर करण्याबाबत.

संदर्भ : शासन निर्णय क्र.वाहभ-२०१४/प्र.क्र.६/सेवा-५, दि.१०.०८.२०१५.

.........

महाराष्ट्र शासनाने सर्वोच्च न्यायालयाने दि.१२.१२.२०१३ रोजी रिट पिटीशन (सिव्हील) क्र.१०७/२०११ मध्ये दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्य शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांमधील मुकबधीर (Deaf & Dumb) अधिकारी/कर्मचारी यांना अंध व अस्थिव्यंगाने अधू आणि कण्याच्या विकाराने पिडीत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना देय असलेल्या दराने वाहतूक भत्ता शासन निर्णय क्र.वाहभ-२०१४/प्र.क्र.६/सेवा-५, दि.१०.०८.२०१५ अन्वये लागू केलेला आहे. याच धर्तीवर महावितरण कंपनीमधील मुकबधीर (Deaf & Dumb) अधिकारी/कर्मचारी यांना वाहतूक भत्ता लागू करण्याची बाब विचाराधीन होती.

२. आता अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन) व संचालक (प्रकल्प) यांच्याशी विचार विनिमय करुन महावितरण कंपनीतील मुकबधीर (Deaf & Dumb) अधिकारी/कर्मचारी यांना शासनाच्या धर्तीवर वाहतूक भत्ता लागू करण्याकरिता मंजुरी प्रदान केली आहे.

३. त्यानुसार मुकबधीर अधिका-यांना/कर्मचा-यांना द्यावयाच्या वाहतूक भत्त्याचे दर खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे असतील.

| अ.क्र | कर्मचा-याची वेतनश्रेणी | दरमहा वाहतूक भत्त्याचा दर (रुपये) | |
|---|---|---|---|
| | | “अ-१” आणि “अ” वर्ग शहरे | इतर ठिकाणे |
| १. | रु.२४७६५ - ५५०८० किंवा त्याहून वरच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे अधिकारी | ४८०० | २४०० |
| २. | रु.१६४३५-४२११० किंवा त्याहून वरच्या परंतू रु. २४७६५ - ५५०८० पेक्षा खालच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे अधिकारी/कर्मचारी | २४०० | २००० |
| ३. | रु.१६४३५-४२११० पेक्षा खालच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे कर्मचारी | २००० | २००० |

४. मुकबधीर (Deaf & Dumb) अधिकारी/कर्मचारी यांना उपरोक्त दराने वाहतूक भत्ता खालील अटींच्या अधीन राहून अनुज्ञेय करण्यात यावा :-

क) उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केलेली "अ-१" आणि "अ" वर्ग शहरे स्थानिक पूरक भत्त्याच्या प्रयोजनार्थ केलेल्या शहराच्या वर्गीकरणाप्रमाणे राहतील.

ख) कर्तव्यस्थानापासून एक किलोमीटर अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान व निवासस्थान यांचा एकत्र परिसर असेल अशा ठिकाणी राहणा-या कर्मचा-यांना वरील तक्त्यात नमूद केलेल्या दराच्या निम्म्या दराने, मात्र अशा प्रकारे दर निम्मा केल्याने तो रुपये २००० /- पेक्षा कमी होत असल्यास, किमान रुपये २०००/- या दराने वाहतूक भत्ता मंजूर करण्यात येईल.

ग) ज्या कर्मचा-यांना म.रा.विद्युत वितरण कंपनीकडून वाहतूक सुविधा (Company Transport) पुरविण्यात आली आहे त्यांना हा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

घ) रजा, प्रशिक्षण, दौरा इत्यादी कारणांमुळे ३० दिवसांपेक्षा जास्त अनुपस्थितीच्या कालावधीसाठी हा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

च) मुकबधीर असल्यास शासकीय रुग्णालयाच्या नाक-कान-घसा विभाग प्रमुखांचे शिफारस प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

छ) शासकीय रुग्णालयाच्या नाक-कान-घसा विभाग प्रमुखांचे शिफारस प्रमाणपत्र ज्या दिवशी प्राप्त होईल त्या दिनांकापासून किंवा या आदेशाचा दिनांक यापैकी जो दिनांक नंतरचा असेल त्या दिनांकापासून सदर वाहतूक भत्ता मंजूर करण्यात यावा.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

(संदेश हाके)

**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*D:\O&M\Adm.Cir.F.N.5.doc*
*06/01/2017*